ePaper
अजमेर जाकर मेरे लिये दुआ करो, प्रणिती शिंदेंची मुस्लिम बांधवांना भावनिक साद



| वर्ष - 7 । अंक - 265 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 08 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- जसप्रीत बुमराहने इतिहास रचला!
- सलमान करणार एक वेगळा प्रयोग
- मथुरा आम्ही कसे विसरू शकतो?
- अडगळीत पडलेल्यांना प्रतिनिधी केले

## मिळकतकरामध्ये कसलीही वाढ नाही

# महापालिका आयुक्तांचे ‘डॅमेज कंट्रोल’!

## सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांना दिलासा देण्याचा प्रयत्न

। पिंपरी । महाईन्यूज

**आगामी 2024-25 या आर्थिक वर्षाकरिता करांचे व करेत्तर बाबींचे दर निश्चित करणे तसेच मालमत्ता सर्वेक्षणात नवीन आकारणी होणाऱ्या मालमत्तांचे प्रथम बिल दिल्यानंतर संपूर्ण मालमत्ता कराची आगाऊ रक्कम भरणा करणा-या मालमत्ताधारकांना सामान्य करात सवलत देण्यास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली. तसेच करवाढीचे दर पूर्वीप्रमाणे ठेवण्यासही मान्यता दिली. त्यामुळे आगामी आर्थिक वर्षात कोणतीही करवाढ, दरवाढ होणार नाही.**




प्रशासकीय राजवटीमध्ये धडाकेबाज निर्णय घेतल्यामुळे आयुक्त शेखर सिंह आणि स्थानिक लोकप्रतिनिधी व पिंपरी-चिंचवडकरांमध्ये नकारात्मक सूर होता. वाकडमधील टीआर प्रकरणानंतर सिंग यांच्याबद्दल विरोधाची धार आणखी वाढली होती. त्यामुळे कर आकारणीचे दर निश्चित करताना ‘डॅमेज कंट्रोल’ करण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला आहे, अशी चर्चा महापालिका वर्तुळात आहे.

### विविध विकासकामांना मान्यता...

अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत दत्तवाडी, विठ्ठलवाडी परिसरात तसेच कासारवाडी मैला शुद्धीकरण केंद्रांतर्गत प्रभाग 2 व 6 मध्ये आणि पिंपळे सौदागर,विश्वशांती कॉलनी,काटेवस्ती,गावठाण परिसरात,पिंपळे निलख,विशालनगर,कस्पटेवस्ती,वेणूनगर, दत्त मंदीर, रहाटणी, रामनगर,शिवराजनगर येथील जलःनिसारण नलिका व मॅनहोल चेंबर्सची दुरूस्ती व देखभाल करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. चिंचवडेनगर, वाल्हेकरवाडी बिजलीनगर व इतर परिसरांमध्ये, किवळे विकासनगर, दत्तनगर,बापदेवनगर, आदर्शनगर व मामुर्डी येथील साईनगर, आदर्शनगर आझाद नगर परिसरामध्ये जुन्या जलनि:सारण नलिका बदलणे व ड्रेनेज लाईन्स व चेंबर्सची दुरूस्ती करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

कासारवाडी मैला शुद्धीकरण केंद्रांतर्गत वार्षिक ठेकेदारी पद्धतीने दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी परिसर व उर्वरित भागामध्ये ड्रेनेज लाईनची व चेंबर्सची देखभाल दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

## पिंपळे निलख येथील रस्त्याला गती...

» प्रभाग क्रमांक 26 पिंपळे निलख येथील रक्षक चौक ते पिंपळे निलख संरक्षण विभागाच्या हद्दीतील जाणाऱ्या 18 मीटर डीपी रस्त्यास सबवे करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. रावेत येथील हलविण्यात येणाऱ्या मुख्य जलवाहिनीस अडथळा करणाऱ्या 22 के.व्ही. भूमिगत केबल बदलणेकामी, तसे मेट्रो प्रकल्पांतर्गत दापोडी ते पिंपरी मेट्रो पूलाखाली सुशोभित खांब व दिवे बसवणेकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच, कासारवाडी गेटाखालील रस्त्याची दुरुस्तीची कामे करणे कामी तसेच जलशुद्धीकरण सेक्टर 23 निगडी येतील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस उच्च दाब वीजभार वाढवणेकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.

---

## भारताच्या शाश्वत विकासाचा संकल्प!

## » शहराध्यक्ष शंकर जगताप : भाजपाचे गाव चलो अभियान

। पिंपरी ।

आगामी लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे ४०० हून अधिक खासदार निवडून आणण्याचा चंग पक्ष कार्यकर्त्यांनी बांधला आहे. देशात तिसऱ्यांदा मोदी सरकारला प्रचंड बहुमतांनी निवडून देत देशाला शाश्वत विकासाकडे नेण्याचा संकल्प आहे. त्यादृष्टीकोनातून पिंपरी-चिंचवडमधील प्रत्येक घरापर्यंत पोहोचून केंद्र आणि राज्य सरकारच्या यशोगाथा व विविध कल्याणकारी योजना सांगितल्या जात आहेत. त्यासाठी शहर भाजपाने घर चलो अभियान सुरू केले आहे, असे मत भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केले.



> “ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या यशस्वी १० वर्षांच्या वाटचालीमध्ये घेतलेले ऐतिहासिक निर्णय, कल्याणकारी योजना आणि विकासकामे घरोघरी पोहोचवण्यासाठी प्रयत्न ‘गाव चलो’ अभियानाच्या माध्यमातून करीत आहोत. बुथ समिती व पन्ना प्रमुख यांना त्यांच्यावरील असलेल्या जबाबदाऱ्या सोपवून आगामी निवडणुकीत प्रत्येक बुथवर ५१ टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे ‘अबकी बार ४०० पार’ चा नारा खरा होणार आहे.
>
> **- शंकर जगताप,**
> शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# राष्ट्रवादी भवनावरील चिन्ह हटविले!

## शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगतापांच्या डोळ्यात पाणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष आणि पक्षाचे घड्याळ हे चिन्ह अजित पवार यांना देण्याच्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे पडसाद बुधवारी शहरात उमटले. शरद पवार समर्थकांकडून शिवाजीनगर येथील राष्ट्रवादी भवनातील अजित पवार यांचे नाव असलेली कोनशिला फोडण्यात आली.**

त्यावरून अजित पवार आणि शरद पवार सर्मथकांमध्ये काही काळ वादावादी झाली. त्यानंतर शरद पवार गटाकडून राष्ट्रवादी भवनावरील घड्याळ चिन्ह हटविण्यात आले. दरम्यान, शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांनी निषेध सभा घेत शरद पवार यांच्यासोबत खंबीरपणे उभे राहून आगामी निवडणुकीत विरोधकांना पराभूत करण्याचा निर्धार करण्यात आला.राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर पक्षाचा ताबा आणि चिन्ह अजित पवार यांच्याकडे राहील, असा निकाल केंद्रीय निवडणूक आयोगाने मंगळवारी दिला होता. त्यानंतर शरद पवार गटाची राष्ट्रवादी काँग्रेस भवनात निषेध सभा झाली.भारतीय जनता पक्षाने देशावर त्यांचा एकछत्री अंमल राहावा या मानसिकतेतून देशातील सर्वच प्रादेशिक पक्षांना उध्वस्त करण्याचे धोरण अवलंबले आहे. शरद पवार यांनी अथक परिश्रमातून उभा केलेला पक्ष अजित पवार यांनी एका रात्रीत भाजपच्या झोळीत टाकला, असा आरोप यावेळी करण्यात आला.



बैठकीनंतर भाजपच्या दडपशाहीचा निषेध करण्यासाठी तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी शरद पवार गटाच्या काही कार्यकर्त्यांनी अजित पवार यांचे नाव असलेली कोनशिला हातोडीने फोडली.दरम्यान, हा प्रकार उघडकीस आल्यानंतर अजित पवार समर्थकांनी राष्ट्रवादी भवनात धाव घेतली. त्यामुळे दोन्ही गटाचे कार्यकर्ते आणने-सामने आले. मात्र संतप्त भावनेतून हा प्रकार घडल्याचा दावा शरद पवार गटाकडून करण्यात आला. त्यावेळी दोन्ही गटात किरोकळ वादावादी झाल्याची माहिती शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी दिली. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस भवनातील पक्षाचे नाव काळ्या कापडाने झाकण्यात आले असून घड्याळ हे निवडणूक चिन्हही हटविण्यात आले.निवडणूक आयोगाकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे नाव आणि चिन्ह अजित पवार गटाला देण्यात आल्यानंतर आता त्याचे पडसाद कार्यालयांमध्येही उमटू लागले आहेत. पक्ष आणि चिन्हाचा फैसला झाल्यानंतर राज्यातील कार्यालयांमध्ये सुद्धा वाद जाऊन पोहोचला आहे. आज (7 फेब्रुवारी) पुण्यामध्ये शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी कार्यालयावरील घड्याळ चिन्ह हटवलं. यावेळी कार्यालयावरील चिन्ह काढताना डोळ्यांमध्ये अश्रु अनावर झाले. जगताप यांनी आपल्या गाडीवरील सुद्धा घड्याळ चिन्ह कढून टाकले. 24 वर्षापासून कार्यालय पाहत असताना हे दिवस येतील, असे वाटलं नव्हतं, असे ते म्हणाले. दरम्यान, पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या कार्यालयाबाहेर पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. राष्ट्रवादी कार्यालयावरील चिन्ह काढण्यात आल्यानंतर नाव देखील काळ्या कापडाने झाकण्यात आला आहे. शरद पवारांकडून चिन्ह आणि नाव गेल्यानंतर पुण्याचे शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप भावूक झाले. चिन्हाची पाटी काढताना जगताप यांच्या डोळ्यात अश्रू आले. चिन्ह काढून पाटी झाकण्यात आल्यानंतर अजित पवार गटाचा कार्यकर्ता यावेली जाब विचारण्यासाठी पोहोचला. अजित पवारांच्या नावाची तोडफोड करण्यात आल्याचा आरोप करत जाब विचारण्याचा पयत्न केला. अजित पवार गट उपाध्यक्ष दत्ता सागरे आक्रमक झाले.

### शरद पवार गटाचं नाव ठरलं

» दरम्यान शरद पवार गटाला 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' हे नाव मिळालं आहे. शरद पवार गटाला केंद्रीय निवडणूक आयोगाने हे नाव दिलं आहे. राज्यसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे नाव देण्यात आलं असल्याची माहिती समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह हे अजित पवार गटाकडे गेल्यानंतर शरद पवार गटाला नव्या नावासाठी आणि चिन्हासाठी निवडणूक आयोगाला काही पर्याय द्यायचे होते. त्यामध्ये शरद पवार गटाने नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरद पवार, नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार , नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदराव पवार ही तीन नावं दिली होती. त्यामध्ये निवडणूक आयोगाने 'नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार' म्हणजे 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' हे नाव त्यांना दिलं आहे.

# शरद पवार हाच आमचा पक्ष... आणि निवडणूक चिन्ह!

## विचारांची लढाई कायम राहील : युवक शहराध्यक्ष इम्रान शेख

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शरद पवार हाच आमचा पक्ष... आणि निवडणूक चिन्ह आहे... विचारांशी गद्दारी केलेल्या लोकांना जनता माफ करणार नाही. आगामी काळात जनतेच्या न्यायालयात न्याय मिळणार आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वात विचारांची लढाई कायम राहील, असा दावा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवक शहराध्यक्ष इम्रान शेख यांनी केला आहे.**



राष्ट्रवादीपक्ष व चिन्हाच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयानंतर सरकार व निवडणूक आयोग यांच्या विरोधात पिंपरी-चिंचवड शहर शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने डॉ. आंबेडकर चौक येथे जोरदार निदर्शने केली. यावेळी युवक शहराध्यक्ष इमरान शेख, महिला शहराध्यक्ष ज्योतीताई निंबाळकर, युवक कार्याध्यक्ष सागर तापकीर, प्रवक्ते माधव पाटील, भोसरी विधानसभा अध्यक्ष संतोष शिंदे,वरिष्ठ उपाध्यक्ष काशिनाथ जगताप, महिला उपाध्यक्ष रेखा मोरे, जिल्हा सरचिटणीस मेघराज लोखंडे, शहर संघटक अश्रफ शेख, राजेश हरगुडे, नितीन मोरे, सचिन शिंदे, हाजी मलंग शेख, समाधान आचलखांब, तनवीर अहमद, पियुष अंकुश, साहिल वाघमारे,मयूर खरात,उमेश धोत्रे आणि मोठ्या संख्येने राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

### पक्ष गेला, चिन्ह गेले...

» "पक्ष गेला, चिन्ह गेले... राहिला तो विचार... त्याचे नाव शरदचंद्र पवार..." अशा घोषणा देत युवक शहराध्यक्ष इम्रान शेख यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने निदर्शने करण्यात आली.आले शंभर गेले शंभर शरद पवार एक नंबर, आमचा पक्ष आमचे चिन्ह शरद पवार शरद पवार" या जोरदार घोषणा देण्यात आल्या. शहरातील राजकीय वर्तुळात शरद पवार गटाला मोठी सहानुभूती मिळताना दिसत आहे. शरद पवार हाच आमचा पक्ष... आणि निवडणूक चिन्ह आहे... विचारांशी गद्दारी केलेल्या लोकांना जनता माफ करणार नाही.

# पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र पोस्ट मुख्यालय!

## आमदार महेश लांडगे यांची मागणी : केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांना निवेदन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाच्या धर्तीवर आता पिंपरी-चिंचवड पोस्ट मुख्यालय निर्मिती करावी. ज्यामुळे शहर आणि परिसरातील पोस्ट ग्राहकांना सेवेचा लाभ घेता येईल आणि कामकाजात सुसूत्रता येईल, अशी मागणी भाजपा आमदार तथा शिरूर लोकसभा निवडणूक प्रमुख महेश लांडगे यांनी केली आहे.**



याबाबत केंद्रीय मंत्री, माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांना निवेदन पाठवण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पुणे विभागीय पोस्ट कार्यालयाअंतर्गत पिंपरी-चिंचवड शहराचा समावेश आहे. मुख्य कार्यालयातूनच पुणे जिल्ह्याच्या पश्चिम, पूर्व आणि ग्रामीण भागाचा कामकाज सुरू आहे. यामुळे पुणे जिल्ह्याची लोकसंख्या दोन कोटींच्या जवळपास आहे. पोस्ट ऑफीसच्या कामकाजाचे नियंत्रण पुण्यातील मुख्यालयाच्या माध्यमातून केले जाते.

वास्तविक, पिंपरी-चिंचवड शहर ही 'मेट्रो सिटी' म्हणून नावारुपाला येत आहे. वाढती लोकसंख्या आणि प्रशासकीय कामकाजातील सूसुत्रता यासाठी जिल्हा विभाजन धोरणानुसार, पुणे व पिंपरी-चिंचवड (शिवनेरी) असे दोन जिल्हे स्वतंत्र व्हावेत, असा प्रस्ताव महाराष्ट्र सरकारकडे विचारधीन आहे.२०१८ मध्ये पुणे पोलीस आयुक्तालयाचे विभाजन करुन पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय निर्माण करण्यात आले. त्यामुळे पोलीस प्रशासनाच्या कामकाजामध्ये सुसूत्रता आली आहे. त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवडसाठी भारतीय डाक विभागाचे स्वतंत्र विभागीय कार्यालय निर्माण करावे, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली आहे.

> “ केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या माध्यमातून दि. २४ जून २०२१ रोजी सर्व विभागीय डाक कार्यालयांना पत्र पाठवण्यात आले आहे. त्यामध्ये विभागीय पोस्ट आणि कार्यालयाचे विभाजन याबाबत निर्देश दिले आहेत. त्या अनुसरून पुणे विभागीय पोस्ट मुख्यालयाचे विभाजन करुन पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागासाठी स्वतंत्र पोस्ट मुख्यालय निर्माण करावे, अशी विनंती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांना केली आहे. याबाबत नवी दिल्ली येथे लवकरच मंत्रीमहोदय यांची भेट घेणार आहे.
>
> -महेश लांडगे,
> आमदार तथा शिरुर लोकसभा निवडणूक प्रमुख, भाजपा.-

# दर्जेदार शिक्षणासाठी 'पीसीयु' कटिबद्ध!

## कुलपती हर्षवर्धन पाटील : साते येथे अत्याधुनिक शैक्षणिक संकूल

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) 33 वर्षांपासून शैक्षणिक सेवा देण्याचे कार्य करीत आहे. पीसीईटी अंतर्गत शैक्षणिक संस्थांमधून आतापर्यंत हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडले आहेत. आता संस्थेने एक पाऊल पुढे टाकत पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयु) सुरू केले आहे. साते, वडगांव मावळ येथे विस्तीर्ण क्षेत्रात अत्याधुनिक शैक्षणिक सुविधांनी युक्त सुसज्ज, दर्जेदार शिक्षण विद्यार्थ्यांना मिळणार आहे, असे पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले..**



माध्यम प्रतिनिधींनी नव्याने सुरू झालेल्या पिंपरी चिंचवड विद्यापीठास (पीसीयु) बुधवारी भेट दिली. यावेळी कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी उपस्थितांशी संवाद साधला. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आदी उपस्थित होते दि. 16, जानेवारी 2023 मध्ये पीसीईटीच्या पिंपरी चिंचवड विद्यापीठाची घोषणा शासनाने केली; आणि सहा मे 2023 मध्ये मान्यता मिळाली. विद्यापीठाने अनेक अभ्यासक्रम सुरू केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने एमबीए इंटरनॅशनल, इंटरनॅशनल स्टडी टूर सॅप सर्टिफिकेशन, तसेच दुहेरी स्पेशलायझेशन – विपणन, वित्त, व्यवसाय विश्लेषण, माहिती तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग आणि मीडिया व्यवस्थापन, मानव संसाधन व्यवस्थापन, कृषी व्यवसाय व्यवस्थापन, फार्मास्युटिकल व्यवस्थापन, दहा पेक्षा अधिक मूल्यवर्धित प्रमाणपत्रे, नोकरी सुरक्षित कार्यक्रम. संगणक शास्त्र, व्यवस्थापन, आहारशास्त्र, क्लिनिकल मानसशास्त्र अन्य अभ्यासक्रम फार्मास्युटिकल, संगणक विज्ञान, एआय आणि एमएल, मास मीडिया आणि पत्रकारिता, डिजिटल फिल्म मेकिंग, कायदा, डिझाइन, आरोग्य विज्ञान, कला (इंग्रजी, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र इ.) व पीएचडी – आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

### रोपटे आज वटवृक्ष...

» एस बी पाटील यांनी लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर – माजी खासदार कै. शंकरराव बाजीराव पाटील यांनी सुरू केलेल्या पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रोपट्याचे आता वटवृक्षामध्ये रूपांतर झाले आहे. पीसीईटीच्या शैक्षणिक संस्थां मधून व्यवस्थापन, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, तंत्रनिकेतन, विविध विषयांचे व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम तसेच इंग्रजी माध्यमाच्या शाळा, महाविद्यालय अशा शैक्षणिक अभ्यासक्रमांची अद्ययावत व्यवस्था आकुर्डी, रावेत, तळेगाव, साते, वडगांव मावळ परिसरामध्ये विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे.

### उत्तम कॅम्पस प्लेसमेंटसाठी प्रसिद्ध...

»पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट ही शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरण आणि राज्यातील उत्तम कॅम्पस प्लेसमेंट यासाठी सुप्रसिद्ध असलेली संस्था आहे. संशोधनासाठी अद्ययावत प्रयोगशाळा आणि तज्ज्ञ मार्गदर्शक आहेत. संशोधन क्षेत्रात मागील काही वर्षांमध्ये एक मोठी झेप संस्थेने घेतली असून सुमारे अडीचशे कॉपीराइट्स आणि सुमारे पाचशे पेटंट्स संस्थेने मिळवले आहे. यासाठी 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये या कार्याची दखल घेण्यात आली आहे.

### गुणवंत, होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती...

»पीसीयु प्रतिभावान, गुणवंत होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना राबविण्यात आली आहे. आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती. आफ्रिका, दक्षिण आफ्रिका, पश्चिम आफ्रिका, सार्क देश (अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, भारत, मालदीव, नेपाळ आणि श्रीलंका) आणि मध्य-पूर्वेकडील आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती. भारतातील विशिष्ट प्रदेशातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती. ज्या विद्यार्थ्यांनी त्यांचे पालक गमावले आहेत आणि आर्थिक अडचणींचा सामना करत आहेत त्यांच्यासाठी शिष्यवृत्ती.

# न्यायवृंद व्यवस्थेची सांविधानिक बाजू




**न्यायवृंद व्यवस्थेत निश्चितच काही दोष आहेत, परंतु त्यांची तीव्रता इतकीही नाही की न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य काढून ती राजकीय प्रभावाखाली कार्यरत व्हावी. जे दोष आहेत त्यासाठी शासन आणि न्यायसंस्थेने सुवर्णमध्य काढणे गरजेचे आहे.**



सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती समिती कायदा असंविधानिक ठरवत २०१५ मध्ये न्यायवृंद व्यवस्था अधोरेखित केली. दरम्यानच्या काळात माजी विधी व न्यायमंत्री किरेन रिजिजू व उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी न्यायवृंद पद्धतीवर टीका केली. न्यायवृंद व्यवस्थेच्या संदर्भात वकील मॅथ्यूस नेदुमपरा यांच्या २०२२ सालच्या प्रलंबित याचिकेची पुन्हा नवीन वर्षात सुनावणी घेण्याची मॅथ्यूस यांनी सरन्यायाधीशांना विनंती केली. गेल्या काही वर्षात सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब करूनही न्यायवृंद व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह कायम आहे. न्यायवृंद व्यवस्था कशी अस्तित्वात आली आणि प्रस्थापित झाली, त्यासाठी निमित्त ठरलेले निकाल, न्यायवृंद व्यवस्थेची एक बाजू समोर आणतात.न्यायवृंद व्यवस्थेसंदर्भात पहिले प्रकरण म्हणून या व इतर एकत्रित केलेल्या याचिकांचा निकाल ३० डिसेंबर १९८१ रोजी आला. केंद्र सरकारच्या विधी व न्याय विभागाने मार्च १९८१ साली उच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांची इतर राज्यांत बदली व्हावी यासाठी राज्यांतील उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना पाठवलेले पत्र निमित्त ठरले. त्याविरोधात पहिली याचिका दाखल केली ती मुंबईतील वकील इक्बाल छागला यांनी. याच काळात केंद्राकडून न्यायपालिकेच्या अधिकारांवर अतिक्रमण होत आहे, असा मतप्रवाह होता. काही ठिकाणी उच्च न्यायालयात नियुक्त अतिरिक्त न्यायाधीशांचा कार्यकाळ संपत आलेला असतानाही त्यांना कायमस्वरूपी न्यायाधीश नेमण्यासाठी केंद्र सरकारची अनास्था याचिकेला कारणीभूत ठरत होती. एस. पी. गुप्ता या वकिलांनी अलाहाबाद उच्च न्यायालयात तीन न्यायाधीशांची कायमस्वरूपी नियुक्ती व्हावी यासाठी याचिका केली होती. सर्वोच्च न्यायालयातील वकील लिली थॉमस यांनी घटनेच्या अनुच्छेद २२२(१) अंतर्गत उच्च न्यायालयाच्या काही मुख्य न्यायाधीशांच्या बदल्यांना आव्हान दिले होते. या प्रकरणात सर्व याचिका एकत्रित सुनावणीसाठी सर्वोच्च न्यायालयाने स्वत:कडे मागवून घेतल्या. सर्वोच्च न्यायालयाच्या सात सदस्यीय घटनापीठातील न्या. भगवती यांनी न्यायाधीशांची बदली, नियुक्ती, प्रशासकीय बाबींसंदर्भात न्यायवृंद ही संकल्पना मांडली. याचिकेतील विविध विषयांवर कारणमीमांसा करताना विविध निर्देश दिले गेले. एकत्रित याचिकांच्या व्यापक विषयावर न्यायसंस्थेच्या स्वातंत्र्याला प्राधान्य म्हणून न्यायवृंद व्यवस्था अस्तित्वात आली.

२६ ऑक्टोबर १९९० रोजी सर्वोच्च न्यायालयाने एस. पी. गुप्ता (पहिले न्यायाधीश प्रकरण) निकालाचा फेरविचार व्हावा अशी मागणी करणाऱ्या याचिकेत नऊ सदस्यीय पीठ स्थापन करावे असे निर्देश दिले. त्यानुसार नऊ सदस्यीय घटनापीठाने ६ ऑक्टोबर १९९३ रोजी निकाल दिला. पहिल्या न्यायाधीश प्रकरणात न्यायवृंद व्यवस्था अस्तित्वात आली होती. परंतु न्यायालयाने त्या प्रकरणात सरन्यायाधीशांच्या शिफारशींवर प्रशासनाच्या निर्णयाला प्राधान्य असेल असा निकाल दिला होता. न्यायाधीशांच्या नियुक्त्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानंतर राष्ट्रपतींच्या आदेशाने होत असल्याने अनुच्छेद ५० अंतर्गत अभिप्रेत न्यायसंस्थेच्या स्वातंत्र्यास मोकळीक नसल्याची भावना निर्माण झाली होती. या प्रकरणी नऊ सदस्यीय घटनापीठाने 'सल्लामसलत' आणि 'सहमती' या राज्यघटनेच्या तरतुदीतील शब्दांचे विश्लेषण आपल्या निकालपत्रात अधिक व्यापक स्वरूपात मांडले. पहिल्या न्यायाधीश प्रकरणातील न्यायाधीश नियुक्त्यांच्या संदर्भातील प्रशासकीय निर्णयाला असलेले प्राधान्य सर्वोच्च न्यायालयाने संपुष्टात आणले. दोन ज्येष्ठ न्यायाधीशांचे मत विचारात घेऊन सरन्यायाधीश उच्च आणि सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नियुक्त्यांसंदर्भात राष्ट्रपतींना नावे सुचवतील असा निकाल दिला.

## संपादकीय »

### परीक्षा पे चर्चा!

***केंद्र सरकारने परीक्षेतील गैरव्यवहार- म्हणजे बहुतांश प्रकरणांत कॉपी- रोखण्यासाठी नवे नमुना विधेयक सादर केले आहे.***

केंद्र सरकारने परीक्षेतील गैरव्यवहार- म्हणजे बहुतांश प्रकरणांत कॉपी- रोखण्यासाठी नवे नमुना विधेयक सादर केले आहे. शिक्षण आणि परीक्षा हे राज्यांच्याही अखत्यारीतील विषय. तेव्हा केंद्राने सादर केलेल्या विधेयकाच्या आधारे राज्याराज्यांनी आपापले स्वतंत्र कायदे करणे अपेक्षित आहे. केंद्रीय कायद्यात अशा गैरव्यवहारांसाठी तीन ते १० वर्षेपर्यंत तुरुंगवास आणि/ किंवा कोटभर रुपयांपर्यंत दंड अशी शिक्षा सुचवण्यात आलेली आहे. कोणत्याही विषयावरचा कायदा त्या विषयाशी संबंधित गैरव्यवहारांस शासन करण्यासाठी असतो. ते योग्यच. हा शासन व्यवहाराचा भाग झाला. तथापि अनेक मुद्दे हे कायदा आणि शासन यांच्या पलीकडचे असतात आणि ते केवळ सरकारला वाटते म्हणून यम-नियमांनी सोडवता येत नाहीत. त्यासाठी प्रबोधन आणि नागरिकांच्या जगण्याच्या सवयींत प्रयत्नपूर्वक बदल करावा लागतो.

**उद्यमशील, उद्योगी, उपेक्षित!' हा अग्रलेख (५ फेब्रुवारी) वाचला. बाजाराधिष्ठित व्यवस्था, त्यातील स्पर्धा, समभाग-संस्कृती हे सारे पाश्चिमात्य लोकशाही व्यवस्थांमध्ये बऱ्याच पूर्वी उदयास आले व स्थिरावले. त्यामुळे इंग्रजीतील काही म्हणींमध्ये त्यामागची अनुभवांतून आलेली शहाणीव स्पष्ट दिसते.**

## देशात बाजारविषयक शहाणीवेचा अभाव

शहाणीवेच्या अभावामुळे गुंतवणूकदारांना गंडा घालणे सोपे जात असावे. अगदी पन्नासच्या दशकातील मुंदडा बंधू, नव्वदच्या दशकातील शेरेगर वा हर्षद मेहता ही प्रकरणे, गाजलेल्या साखळी योजना, अनेक 'स्टार्टअप्स'चे झपाट्याने 'युनिकॉर्न' होणे आणि नंतर आपटणे हे सारे गुंतवणूकदारांचा भाबडेपणाच दाखवते.झटपट श्रीमंतीची आस, 'सगळे तसे करताहेत मग आपण तरी मागे का राहायचे' ही मानसिकता तीच असली तरी प्रत्येक वेळी ती वेगळ्या पद्धतीने वापरली जाते. कधी 'न्यू इकॉनॉमी'चा, कधी 'डॉटकॉम'चा, कधी 'मोबाईल ॲप्स' वा 'उबरायझेशन'चा बोलबाला होतो. तसाच अवास्तव बोलबाला पेटीएम व बैजूजचाही झाला होता. कुठलेही चटकदार वाटणारे 'मोबाइल ॲप' काढणारी कंपनी ही भविष्यात मोठी यशस्वी कंपनी होणारच, हे जणू गृहीतच धरले जाते व बुडबुडा निर्माण केला जातो. त्यात रोकडय़ा नफ्याऐवजी



भलत्याच गोष्टींना महत्त्व दिले जाते. (कधीकधी तर प्रचंड मोठा तोटा पदरी घालणारी अफाट ग्राहकसंख्या हीच जणू मिरवण्याची गोष्ट समजली जाते!)काळा पैसा बाहेर काढण्याचे निमित्त सांगत नोटाबंदीचा जालीम उपाय योजला गेला. सर्व भारतीयांना १०० दिवस कळ सोसण्याचे भावनिक आवाहन करण्यात आले. जनतेची सहनशीलता संपून संतापाचा उद्रेक होऊ नये, यासाठी पेटीएमला नको एवढे महत्त्व देण्यात आले. आपल्यावर खुद्द अवतारी पुरुषाचा हात आहे, तेव्हा भीती कसली, असा पेटीएमचा ग्रह झाला. कंपनीने जमेल तेवढे नियम धाब्यावर बसविले. नोटाबंदीनंतर खुद्द पंतप्रधानांचे छायाचित्र असलेल्या पान-पानभर जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. त्यामुळे पेटीएमची आजच्यासारखी अवस्था होईल, असे तेव्हा कोणी स्वप्नातही कल्पिले नसेल.मोदींचे दक्षिणायन..' हा 'लालकिल्ला' सदरातील महेश सरलष्कर यांचा लेख (५ फेब्रुवारी) वाचला. सत्तेसाठी वस्त्रे बदलणे, साधूंच्या वेशातील भगवी वस्त्रे परिधान करणे फसवे वाटते. मतदारांच्या हदयावर आपल्या साम्राज्याची मोहर उमटविण्यासाठी मोदींनी हिंदुत्वाची मशाल तेवत ठेवली असली, तरी त्यातील दक्षिणायन म्हणजे, 'सनातन विरुद्ध द्रविड' हा उलटा प्रवास ठरेल. यातून विशेष काही हाती लागण्याची सुतराम शक्यता नाही. दक्षिणेकडील राज्यांत मतांचा टक्का वाढला तरी जागा मिळण्याची शाश्वती अजिबात नाही. केजरीवाल यांची ईडीकडून होणारी पिळवणूक ही हुकूमशाही नाही? अस्तित्वात असलेली राज्य सरकारे (महाराष्ट्र, बिहार, झारखंड आदी..) पाडून सत्ताकांक्षी होता येईल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अडगळीत पडलेल्यांना लोकप्रतिनिधी केले!

## मंत्री तानाजी सावंत यांची फटकेबाजी; नेमका रोख कोणावर?

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अडगळीत पडलेल्या दोनजणांना आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने मी लोकप्रतिनिधी केले. ग्रामपंचायत निवडणुकीत निवडून येण्याची ज्याची लायकी नाही, त्याला आमदार केले. त्यांनी आपल्यावर खूप शिंतोडे उडविले. आपल्यामुळेच ते राजकारणात जीवंत झाले. तेरणा कारखान्यातील भंगार सुध्दा विकले. शेतकऱ्यांची तर वाट लावली.**



जे काही असेल ते हम और हमारा कुटुंब. कोणताही ठेका असो तो मामाला, काकाला आणि भावाला, अशीच पध्दत होती. जय भवानी, जय शिवाजी म्हणणारे शिवसैनिक यांनीच देशोधडीला लावले, अशा प्रखर शब्दांत मंत्री तानाजी सावंत यांनी विरोधकांसह मित्रपक्षांवर जोरदार फटकारे ओढले.ढोकी येथील तेरणा कारखाना परिसरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या शिवसेनेच्या कार्यकर्ता मेळाव्यात पालकमंत्री सावंत बोलत होते. धाराशिव जिल्ह्यातील सहकारी संस्था मागील सत्ताधाऱ्यांनी मोडीत काढल्या. तेरणा कारखान्याची काय अवस्था करून टाकली होती? आपल्या सर्वांना माहिती आहे. दूध संघाचीही तीच अवस्था. जिल्हा सहकारी बँकही देशोधडीला लावली. शिवसैनिकांसाठी यांनी एकही काम केले नाही. जिल्ह्यातील सहकारी चळवळ जिल्ह्यातीलच पुढाऱ्यांनी मोडीत काढली. मुख्यमंत्री म्हणून आपण सर्वांसमक्ष आश्वासन द्यावे, आपल्या माध्यमातून जिल्ह्यातील पिचलेला शेतकरी आणि मोडीत निघालेली सहकार चळवळ पुन्हा एकदा जिवंत करण्याचे काम आपण करणार आहोत. यासाठी जिल्हावासीयांच्या वतीने मी आपल्याकडे मागणी मागत आहे, असेही मंत्री तानाजी सावंत यांनी सांगितले. ही सगळी व्यवस्था पुन्हा एकदा नव्याने उभी करावयाची आहे. कारण सहकार चळवळीत मोठ्या आदराने राज्यातील ज्या एक-दोन जिल्ह्यांचे नाव घेतले जात होते, त्यात धाराशिव जिल्हा प्राधान्याने येत होता. राज्यासमोर या जिल्ह्याने विविध उपक्रम राबविले आहेत. ते सगळे विधायक उपक्रम मोडीत निघाले आहेत. हे सगळे कशामुळे झाले? असा सवाल उपस्थित करीत माझ्या शेतकरी बांधवांना रस्त्यावर वनवन करीत फिरण्याची वेळ कुणामुळे आली, असा टोकदार प्रश्नही मंत्री सावंत यांनी यावेळी उपस्थित केला. मुख्यमंत्री महोदयांचे उंबरठे झिजवून प्रसंगी रडून, हट्ट करून त्यांच्याकडून शहराच्या विकासासाठी कोट्यवधी रूपयांचा निधी आणला. त्यावेळी मुख्यमंत्री महोदयांकडे नगरविकास खाते होते. शेकडो कोटी रूपये शहराच्या विकासासाठी ज्यांनी आणले, त्यांनीच आज शहर बकाल करून टाकले आहे. शहराचा अक्षरशः उकिरडा झाला आहे. शहरवासीयांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था देण्यातही यांना यश आलेले नाही. आजही आठ दिवसाआड एकदा शहरात पाणीपुरवठा केला जातो. शहरातील रस्ते, गल्लीबोळ, कचऱ्याच्या ढिगाखाली दबले आहेत. कचरा उचलण्यासाठी यांच्याकडे पैसे नाहीत. शेकडो कोटी रूपये आणलेला निधी कुठे गेला, असा खरमरीत सवालही सावंत यांनी उपस्थित केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच शहरातील रस्त्यांसाठी १५४ कोटी रूपये मंजूर केले आहेत. अद्याप अध्यादेश निघावयाचा आहे, तोवरच फलकबाजी सुरू आहे. निधी आम्ही आणला आणि फलक दुसरे झळकावत आहेत, अशा शब्दात मित्रपक्षाचा कान पिळायलाही सावंत विसरले नाही. तेरणा कारखाना भाडेकराराने घेत असताना कोण अडचणी निर्माण करत होते? हे सर्वांना माहिती आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दम दिला आणि लातूरकरांनी पाय आखडून घेतले, अशा शब्दांत पालकमंत्री तानाजी सावंत यांनी लातूरच्या देशमुखांवरही निशाणा साधला.

### दूध संघाचीही तीच अवस्था

» जे काही असेल ते हम और हमारा कुटुंब. कोणताही ठेका असो तो मामाला, काकाला आणि भावाला, अशीच पध्दत होती. जय भवानी, जय शिवाजी म्हणणारे शिवसैनिक यांनीच देशोधडीला लावले, अशा प्रखर शब्दांत मंत्री तानाजी सावंत यांनी विरोधकांसह मित्रपक्षांवर जोरदार फटकारे ओढले.ढोकी येथील तेरणा कारखाना परिसरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या शिवसेनेच्या कार्यकर्ता मेळाव्यात पालकमंत्री सावंत बोलत होते. धाराशिव जिल्ह्यातील सहकारी संस्था मागील सत्ताधाऱ्यांनी मोडीत काढल्या. तेरणा कारखान्याची काय अवस्था करून टाकली होती? आपल्या सर्वांना माहिती आहे. दूध संघाचीही तीच अवस्था. जिल्हा सहकारी बँकही देशोधडीला लावली. शिवसैनिकांसाठी यांनी एकही काम केले नाही. जिल्ह्यातील सहकारी चळवळ जिल्ह्यातीलच पुढाऱ्यांनी मोडीत काढली. मुख्यमंत्री म्हणून आपण सर्वांसमक्ष आश्वासन द्यावे, आपल्या माध्यमातून जिल्ह्यातील पिचलेला शेतकरी आणि मोडीत निघालेली सहकार चळवळ पुन्हा एकदा जिवंत करण्याचे काम आपण करणार आहोत. यासाठी जिल्हावासीयांच्या वतीने मी आपल्याकडे मागणी मागत आहे, असेही मंत्री तानाजी सावंत यांनी सांगितले. ही सगळी व्यवस्था पुन्हा एकदा नव्याने उभी करावयाची आहे. कारण सहकार चळवळीत मोठ्या आदराने राज्यातील ज्या एक-दोन जिल्ह्यांचे नाव घेतले जात होते.

# तपास यंत्रणा वापरून महाराष्ट्र अस्थिर करण्याचा प्रयत्न होतोय

## महाराष्ट्र समाजिक आणि आर्थिकदृष्ट्या अस्थिर : जयंत पाटील

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्रात सरकारी यंत्रणा वापरून रोज नवनवे प्रश्न करून अन्याय-अत्याचाराच्या गोष्टी घडत आहेत. त्यातून महाराष्ट्र समाजिक आणि आर्थिकदृष्ट्या अस्थिर करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केला आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसला सध्या अडचणीत आणले तरी भविष्यात हा पक्ष पुन्हा उभारी घेईल, असा आत्मविश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.**

माढा लोकसभा मतदारसंघात जयंत पाटील यांनी दौरा करून टेंभुर्णी (ता. माढा ) येथे आयोजित पक्ष कार्यकर्त्यांचा मेळाव्यात मार्गदर्शन केले. त्यावेळी बोलताना त्यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी पक्षाचे नाव आणि घड्याळाचे चिन्ह अजित पवार गटाला बहाल केल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. कणाहीन निवडणूक आयोगाकडून न्यायाची अपेक्षा करता येणार नाही. त्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करणार असल्याचा त्यांनी पुनरूच्चार केला. शरद पवार यांनी स्थापन केलेला राष्ट्रादी काँग्रेस पक्ष आहे.



देशातील विविध २८ राज्यांत हा पक्ष विखुरला आहे. त्यापैकी २३ राज्यांतील पक्ष प्रमुखांनी शरद पवार यांच्याच नेतृत्वाला पाठिंबा दिला आहे. परंतु ही वस्तुस्थिती असताना निवडणूक आयोगाने केवळ महाराष्ट्र विधिमंडळातील बहुसंख्य सदस्य एका बाजूने गेले म्हणून हा चुकीचा निर्णय दिला आहे,असे जयंत पाटील यांनी सांगितले. माढा मतदारसंघात शरद पवार यांच्यावर निष्ठा ठेवून काम करणाऱ्या महिलांना धमक्या दिल्या जातात. परंतु कोणी कितीही त्रास दिला तरी उज्वल भविष्यकाळ आमचाच आहे. पक्ष आणि चिन्ह पळविले गेले. परंतु शरद पवार यांच्यावर असलेले सामान्य माणसाचे प्रेम कोणीही हिरावून नेणार नाही, असेही पाटील यांनी सांगितले. माढा भागासह सोलापूर जिल्ह्यात अभिजित पाटील यांच्यासारख्या नेत्यालाही शरद पवारांची साथ सोडण्यासाठी दबाव आणला जात आहे.

### ऊस दराची लावली स्पर्धा

» साखर कारखाना त्यांनी चालवायला घेतला आणि उत्तमप्रकारे चालवून दाखविला आहे. एवढेच नव्हे तर शेतक-यांच्या उसाला चांगला भाव देऊन माढा भागात ऊस दराची स्पर्धा लावली आहे. परंतु अभिजित पाटील यांच्यावर केवळ राजकीय दबावातून त्रास दिला जात आहे. महाराष्ट्र शिखर बँकेकडून जाणीवपूर्वक कारवाई करून त्यांना त्रास दिला जात असला तरी न्यायालयीन लढाईत ते यशस्वी होतील, असा विश्वासही जयंत पाटील यांनी व्यक्त केला. महाराष्ट्रात सरकारी यंत्रणा वापरून रोज नवनवे प्रश्न करून अन्याय-अत्याचाराच्या गोष्टी घडत आहेत. समाजिक आणि आर्थिकदृष्ट्या अस्थिर करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केला आहे.

# मथुरा आम्ही कसे विसरू शकतो?

## आम्ही नुसते बोलत नाही तर करून दाखवतो : योगी आदित्य

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अयोध्येचे जुने वैभव परत आल्याचा आम्हाला आनंद आहे. आम्ही आमचे वचन पाळले आणि तिथे मंदिर बांधले. आम्ही नुसते बोलत नाही तर करून दाखवतो, असे स्पष्ट करत आम्ही काशी आणि मथुरा कसे विसरू शकतो. हे काम स्वातंत्र्यानंतर व्हायला हवे होते; पण व्होटबँकेसाठी ही सार्वजनिक श्रद्धेची ठिकाणे दूरवर ठेवली गेली, अशा शब्दांमध्ये उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी विधानसभेत विरोधकांना उत्तर दिले. आज (दि.७) राज्यपालांच्या अभिभाषणावर ते बोलत होते.**



यावेळी योगी आदित्यनाथ म्हणाले की, अयोध्या शहरासह तेथील जनतेवर अन्याय झाला. मंदिराचे प्रकरण न्यायालयात होते, त्यामुळे तेथे रस्ते आणि वीज उपलब्ध होऊ शकली नाही. शरयूचा घाट स्वच्छ केला नसता का; पण वाईट हेतूने अयोध्येला शापित ठेवले गेले. देशातील बहुसंख्य समाज फक्त तीन ठिकाणांची (अयोध्या, मथुरा आणि काशी) मागणी करत होता आणि त्यासाठी त्यांना भीक मागावी लागली. आता अयोध्येत भव्य राम मंदिर बांधण्यात आले आहे. आम्ही काशी आणि मथुरा कसे विसरू शकतो. हे काम स्वातंत्र्यानंतर व्हायला हवे होते; पण व्होटबँकेसाठी ही सार्वजनिक श्रद्धेची ठिकाणांकडे दुर्लक्ष करण्यात आले, असेही त्यांनी यावेळी सांगितले.राम मंदिराच्या मुद्द्यावर बोलताना योगी आदित्यनाथ यांनी मथुरा आणि काशीचा मुद्दाही उपस्थित केला. सध्याच्या राजकीय परिस्थितीची महाभारताशी तुलना करताना ते म्हणाले की, जेव्हा आपण अयोध्येबद्दल बोलतो तेव्हा आपल्याला पांडवांची आठवण येते. कृष्ण दुर्योधनाकडे गेला होता आणि म्हणाला होता की त्याला पाच ग्रॅम द्या आणि त्याची सर्व जमीन ठेवा; पण दुर्योधन तेही देऊ शकला नाही. त्याने भगवान श्रीकृष्णालाही ओलीस ठेवण्याचा प्रयत्न केला. अयोध्येबाबत असेच घडल्याचे योगी म्हणाले. काशीच्या बाबतीत असेच घडले. असेच मथुरेच्या बाबतीत घडले. पांडवांनी सुद्धा फक्त पाच ग्रॅम मागितले होते पण इथे काही समाज, इथे श्रद्धा फक्त तीनसाठी बोलत आहे. अगदी त्या तिघांसाठीही कारण ती खास ठिकाणे आहेत. ही देवाच्या अवताराची भूमी आहे. ते सामान्य नाही पण आग्रह आहे. तो आग्रह राजकीय होऊ लागला की, तिथून पुन्हा वादाची परिस्थिती निर्माण होऊ लागते.भारतात लोकांच्या श्रद्धेचा अपमान होत असून जगात कुठेही असे घडले नाही. जे काम सुरू आहे ते स्वतंत्र भारतात पूर्वीच सुरू व्हायला हवे होते. ‘आम्ही फक्त तीन जागा मागितल्या आहेत. इतर ठिकाणांबाबत कोणताही मुद्दा नव्हता. परकीय आक्रमकांनी केवळ या देशातील संपत्तीच लुटली नाही. या देशाचा विश्वासही पायदळी तुडवला गेला. स्वातंत्र्यानंतर त्या आक्रमकांचा गौरव करण्याचे दुष्ट कृत्य केले गेले. तुमच्या व्होट बँकेसाठी. सुईच्या टोकाएवढी जमीनही देणार नाही असे दुर्योधनाने सांगितले होते, असे योगी म्हणाले. मग महाभारत घडायचे होते. त्यानंतर काय झाले? कौरवांची बाजू संपली, असेही योगी आदित्यनाथ म्हणाले. अयोध्येच्या विकासासाठी ३१ हजार कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू आहेत. पूर्वी अयोध्येच्या रस्त्यांवर गोळ्यांचा खळखळाट व्हायचा. प्रदक्षिणा घालण्यास बंदी होती. आता भव्य अयोध्या बांधली जात आहे. पूर्वी या शहरात संचारबंदीची शांतता होती, आता मंगल भवन अमंगल हरी हे गाणे वाजवले जात आहे. आज जगभरातून लोक अयोध्येत येत आहेत. अयोध्येला जगाची सांस्कृतिक राजधानी बनेल, असा विश्वासही योगी आदित्यनाथ यांनी व्यक्त केला.प्रयागराजमध्ये ज्या पद्धतीने कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे २०२५ मध्ये होणाऱ्या महाकुंभाचेही आयोजन स्वच्छता, सुरक्षा आणि सुव्यवस्था या मॉडेलवर केले जाणार आहे, अशी माहितीही योगी आदित्यनाथ यांनी दिली.उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बुधवारी विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर दिले. तसंच, योगी आदित्यनाथ यांनी अखिलेश यादव यांच्या प्रत्येक आरोपाला एक एक करून चोख प्रत्युत्तर दिले. मुख्यमंत्री योगी म्हणाले, आम्ही तिथे मंदिर बांधण्याचा संकल्प केला होता आणि संकल्पापासून ते सिद्धीपर्यंत पोहोचलो. आमचे धोरण, हेतू आणि नियतही स्पष्ट आहे, आम्ही धर्माच्या मार्गावर आलो आहोत आणि त्याचे चांगले परिणामही मिळत आहेत. अखिलेश यांच्या आरोपांवर प्रत्युत्तर देताना ते म्हणाले, पांडवांनी दुर्योधनाकडे फक्त पाच गावे मागितली तशी आम्ही तीनच मागितली होती.

### अखिलेश यादवही बरसले

» योगी आदित्यानाथ म्हणाले, अयोध्येतील राम मंदिराचा निर्णय न्यायालयाने घेतला असेल, पण अयोध्येवर अन्याय झाला. आमचा अपमान झाला, आम्ही अयोध्या, काशी आणि मथुराची मागणी करत होतो आणि करत आहोत. हे काही सामान्य ठिकाण नाही. ते भगवान श्रीकृष्णाला ओलीस ठेवण्याचा प्रयत्न करत होते. नंदीबाबा आता काशीतही प्रकटले आहेत. दुर्योधनाने ज्या प्रकारे पांडवांना पाच गावे देण्याचेही मान्य केले नाही, त्याचीच पुनरावृत्ती झाली. पांडवांवर अन्याय झाला. इथेही तेच घडले. अयोध्येत निर्बंध घातले होते.राम मंदिराच्या अभिषेकचा उल्लेख करताना ते म्हणाले की, ५०० वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर हे काम पूर्ण झाले आहे. प्रभू राम यांना त्यांच्या अस्मितेसाठी संघर्ष करावा लागला असे जगातील पहिले उदाहरण होते. विकास यापूर्वीही होऊ शकला असता. रस्ते रुंद होऊ शकले असते. विमानतळ बांधता आले असते. पण मथुरा काशी वृंदावनाचा विकास थांबला.अखिलेश यादव यांनीही सीएम योगींना सभागृहात घेरले. अखिलेश यादव म्हणाले, “कायदा आणि सुव्यवस्थेबाबत झिरो टॉलरन्स आहे असे तुम्ही म्हणता, मग महिलांवर सर्वाधिक गुन्हे का होतात? सर्वाधिक घटना त्यांच्याविरुद्धच का घडत आहेत? गुन्हे का?” देशात उत्तर प्रदेश अव्वल?

# मोदींच्या भाषणावर मल्लिकार्जुन खरगेंचं चोख प्रत्युत्तर

## नरेंद्र मोदींची हमी फक्त खोटेपणा पसरवण्यासाठी आहे : खरगे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. त्यांनी पक्षावर देशाचे विभाजन करण्याचा गंभीर आरोप केला. दरम्यान, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान मोदींवर काँग्रेस आणि यूपीएविरोधात चुकीची माहिती पसरवल्याचा आरोप केला आहे. “राज्यसभेतील त्यांचे संपूर्ण भाषण केवळ काँग्रेसवर टीका करण्यावर केंद्रीत होते.**

पण त्यांनी बेरोजगारी, महागाई आणि आर्थिक विषमातेबाबत भाष्य केलं नाही”, असं मल्लिकार्जुन खरगे म्हणाले.काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, “दोन्ही सभागृहातील भाषणात पंतप्रधानांनी काँग्रेसवरच निशाणा साधला. गेली १० वर्षे ते केंद्रात आहेत, पण त्यावर बोलण्याऐवजी त्यांनी काँग्रेस पक्षावर टीका करणेच योग्य मानलं. सभागृहात ते ना जनमताच्या मुद्द्यांवर बोलले ना महागाई आणि बेरोजगारीवर. मी तुम्हाला सांगतो की NDA चा अर्थ ‘NO DATA AVAILABLE असा आहे. त्यांच्याकडे ना रोजगार डेटा आहे, ना त्यांच्याकडे आरोग्य सर्वेक्षण डेटा आहे. याचे कारण सरकार सर्व डेटा लपवते आणि खोटे पसरवते. मोदींची हमी फक्त खोटेपणा पसरवण्यासाठी आहे. त्यांनी दोन्ही सभागृहात यूपीए सरकारबद्दल खोटे पसरवले.”केंद्र सरकार आणि मोदींवर हल्लाबोल करताना ते म्हणाले की, UPA सरकारच्या काळात बेरोजगारीचा दर २.२ टक्के होता. मात्र त्यांच्या कार्यकाळात तो ४५ वर्षांतील सर्वोच्च पातळीवर पोहोचला आहे. यूपीएच्या १० वर्षांच्या कारकिर्दीत सरासरी जीडीपी वाढीचा दर ८.१३ टक्के होता आणि सध्याच्या सरकारच्या कार्यकाळात तो केवळ ५.६ टक्के का आहे? जागतिक बँकेच्या मते, २०११ मध्येच भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला होता.



### भारत तोडण्याचा प्रयत्न

» यूपीएच्या कार्यकाळात १४ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यात आले. पण पंतप्रधान मोदी हे सांगणार नाहीत, कारण ते फक्त भाषणातून खोटे बोलण्याचे काम करतात.काँग्रेसने सत्तेच्या लालसेपोटी लोकशाहीची गळचेपी केली. काँग्रेसने लोकशाही पद्धतीने आलेली सरकारं बरखास्त केली. काँग्रेसने देशाचं संविधान, मर्यादा पाळणाऱ्या लोकांना गजाआड केलं. काँग्रेसने वृत्तपत्रांचा गळा घोटला. काँग्रेस देश तोडण्याचे नॅरेटिव्ह रचत गेला. आता उत्तर आणि दक्षिण भारत तोडण्याचा प्रयत्न करत आहेत. आता हा काँग्रेस पक्ष लोकशाही शिकवतोय, प्रवचनं देतोय. ज्या काँग्रेसने जात, पात आणि भाषा यांच्या नावे देश तोडला. दहशतवाद आणि फुटीरतावादाला जन्म घालणारे हेच लोक आहेत.

# अनंत अंबानी-राधिका मर्चंटच्या लग्नात सुरांची मैफिल सजणार

देशातील सर्वात श्रीमंत उद्योगपती असलेल्या मुकेश अंबानीयांच्या कुटुंबात सध्या लग्नाची तयारी जोरात सुरू आहे. मुकेश अंबानी यांचा मोठा मुलगा अनंत अंबानी लवकरच लग्नाच्या बेडीत अडकणार आहे. अनंत त्याची दीर्घकाळापासूनची प्रेयसी राधिका मर्चंटसोबत लग्नगाठ बांधणार आहे. अनंत-राधिकाच्या लग्नसंमारंभात अनेक बॉलिवूड दिग्गज परफॉर्मन्स करणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामध्ये रणबीर कपूरआणि आलिया भट्ट यांच्यासह बॉलिवूडचे प्रसिद्ध गायकही लाईव्ह परफॉर्मन्स देणार आहेत.मुकेश अंबानी यांचा मुलगा अनंत अंबानी आणि राधिका मर्चंटचा लग्नसमारंभ 1 मार्च ते 3 मार्च या दरम्यान होणार आहे. अनंत-राधिकाच्या लग्नसंमारंभाची रंगत वाढवण्यासाठी प्रसिद्ध बॉलिवूड गायकांना निमंत्रण पाठवण्यात आले आहे. त्यामध्ये अरिजित सिंगते प्रीतम आणि हरिहरन यांच्यासारखे दिग्गज गायक अनंत अबानी आणि राधिका मर्चंटच्या लग्नाच्या कार्यक्रमात त्यांच्या सुरांची जादू पसरवतील असं सूत्रांनी सांगितलं आहे. मात्र याबाबत अद्याप कोणतीही औपचारिक माहिती समोर आलेली नाही. मात्र या भव्य विवाह सोहळ्याकडे सर्वांच्या नजरा खिळल्या आहेत.नुकतंच रणबीर



आणि आलियाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यामध्ये हे कपल त्यांची मुलगी राहासोबत मुंबई एअरपोर्टवर दिसले होते. ते दोघेही गुजरातला रवाना झाल्याच्या बातम्या येत होत्या. गुजरातमध्ये रणबीर आणि आलियाचा आणखी एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये दोघेही अंबानी कुटुंबाचा धाकटा मुलगा आकाश अंबानीसोबत दिसत होते. हे पाहून रणबीर आणि आलिया लग्नात खास डान्स परफॉर्मन्स देणार असल्याची अटकळ बांधली जात होती. कोरिओग्राफीचा सराव करण्यासाठी दोघेही गुजरातला पोहोचले असल्याची माहिती समोर आली आहे. अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या लग्नसोहळ्याच्या कार्यक्रमांसाठी निमंत्रण पत्रिका अंबानी कुटुंबाकडून याआधीच जारी करण्यात आली आहे. त्यानुसार दोघांच्या लग्नाचे फंक्शन 1 मार्च ते 3 मार्चपर्यंत चालणार आहे. मूळगावी हे लग्न होणार असून त्यासाठी बॉलिवूडसह इतर सर्वच क्षेत्रातील दिग्गज हजेरी लावणार असल्याची माहिती आहे.

## सलमान करणार एक वेगळा प्रयोग

सलग ३ चित्रपट फ्लॉप झाल्यावर गेल्यावर्षी म्हणजेच २०२३ मध्ये सलमान खानने 'टायगर ३'मधून कमबॅक केलं. सलमानच्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर दमदार कमाई केली. आता या चित्रपटानंतर सलमानच्या 'दबंग ४'ची चर्चा सुरू आहे. आता याविषयी एक नवी माहिती समोर येत आहे. लवकरच सलमान खान 'दबंग ४'बद्दल घोषणा करणार असून या चित्रपटासाठी शाहरुख खानच्या 'जवान'चा दिग्दर्शक ॲटलीशी चर्चा सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.'दबंग'मधील चुलबुल पांडे या पात्राचा स्पिन ऑफ चित्रपटावर सलमान खान करत असल्याची चर्चा होताना दिसत आहे. सलमानच्या जवळच्या व्यक्तीने 'बॉलिवूड हंगामा'ला सांगितल्यानुसार सलमान त्याच्या या अजरामर चुलबुल पांडे या पात्राला एका वेगळ्याच ढंगात प्रेक्षकांसमोर सादर करू इच्छित आहे.

## भूमीला फोन केला होता

अभिनेत्री भूमी पेडणेकर सध्या तिच्या 'भक्षक' चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यग्र आहे. या चित्रपटाची निर्मिती गौरी खान आणि शाहरुख यांनी केली आहे. या चित्रपटात सई ताम्हणकरही महत्त्वाच्या भूमिकेत आहे. चित्रपटाचं शूटिंग संपल्यानंतर शाहरुख खानने फोन केला होता, असा खुलासा भूमीने केला आहे.'भक्षक' चित्रपटाचा ट्रेलर ३१ जानेवारीला प्रदर्शित झाला. हा चित्रपट ९ फेब्रुवारीला नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे किस्से सांगताना न्यूज १८ ला दिलेल्या मुलाखतीत, भूमीने खुलासा केला की चित्रीकरण संपल्यानंतर तिला शाहरुख खानचा फोन आला होता आणि शाहरुखने चित्रपट केल्याबद्दल भूमीचे आभार मानले. भूमी म्हणाली, "ज्या दिवशी चित्रपटाचा शेवटचा दिवस होता. मला आठवतंय मी जेवत होते आणि डोक्यात हेच सुरू होतं की आता चित्रपट पूर्ण झाला आहे आणि या चित्रपटासाठी एक गेट-टूगेदर पार्टीसुद्धा होणार होती त्यासाठी मी उत्सुक होते. आम्ही लखनऊमध्ये होतो आणि तेव्हाच मला शाहरुख सरांचा फोन आला. मी हा चित्रपट केल्याबद्दल त्यांनी माझे आभार मानले आणि मला असं वाटलं की शाहरुख सर हे एक एवढं मोठं व्यक्तिमत्व आहे त्यांनी माझे आभार मानायची काहीच गरज नव्हती."भूमीला शाहरुख खानबरोबर काम करायचे आहे का? असे विचारले असता भूमी म्हणाली, "लहानपणापासूनच हे माझे सर्वात मोठे स्वप्न आहे. त्यामुळे मला खरोखर आशा आहे की मला त्यांच्यासह काम करायची संधी मिळेल.""भक्षक' चा ट्रेलर प्रदर्शित झाल्यानंतर प्रेक्षकांचा उत्साह पाहता शाहरुख खाननेही टीमचे कौतुक केले.



## इंटरनेट हे शक्तिशाली साधन : आयुष्मान

युथ आयकॉन आणि युनिसेफचा राष्ट्रीय राजदूत म्हणून अभिनेता आयुष्मान खुराना त्यांच्या चित्रपट आणि वैयक्तिक कृतींद्वारे सातत्याने सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकतो. महत्त्वाच्या मुद्द्यांवर जागरुकता निर्माण करण्यासाठी तो आपल्या व्यासपीठाचा उपयोग करतो आणि मुलांसाठी आश्वासक वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने काम करतो. सेफ इंटरनेट डे निमित्त, आयुष्मान नियमितपणे मोकळे संभाषण आणि मुलांना जागरूक इंटरनेट वापराचे प्रशिक्षण देण्याचे महत्त्व आयुष्मान खुरानाने अधोरेखित केलं आहे. डिजिटल क्षेत्रात त्यांना तोंड द्यावे लागणारे धोके ओळखून, मुलांसाठी सुरक्षित ऑनलाइन अनुभवांसाठी तो इंटरनेटच्या दुहेरी स्वरूपावर भर देतो. आयुष्मान खुराना म्हणतो की, "इंटरनेट हे एक शक्तिशाली साधन आहे, आणि मुले त्याचा सर्वोत्तम वापर करू शकतील याची आम्हाला खात्री करणे आवश्यक आहे. ते जगाबद्दल जाणून घेण्यासाठी, नवीन छंद शोधण्यासाठी, त्यांची कौशल्ये वाढवण्यासाठी, नोकरीच्या संधी शोधण्यासाठी आणि इंटरनेटचा वापर करू शकतात. तिच्या क्षमतेचा सुरक्षितपणे वापर करणं आवश्यक आहे." आयुष्मान खुराना म्हणतो की, "स्मार्टफोन आणि सोशल मीडियाच्या वाढीमुळे ऑनलाइन ट्रोलिंगमध्ये वाढ झाली आहे, ज्यामुळे मुलांच्या मानसिक आरोग्यावर आणि आत्मसन्मानावर अनेकदा विपरित परिणाम होतो. मुलांना ऑनलाइन स्वच्छता राखण्याच्या मार्गांबद्दल शिक्षित आणि संवेदनशील करणे, केवळ ट्रोलिंग आणि गुंडगिरीपासून संरक्षित राहणेच नाही तर ऑनलाइन ट्रोल, व्यक्तीशी संपर्क साधण्यासाठी पुरेसे अधिकार दिले आहेत याची खात्री करणे अत्यंत महत्त्वाचे आहे."

## दुसऱ्या मुलीच्या जन्मानंतर ईशा -भरत यांच्यात दुरावा

हेमा मालिनी व धर्मेंद्र यांनी मोठी मुलगी ईशा देओल पती भरत तख्तानीपासून विभक्त झाली आहे. भरत व ईशा यांनी संयुक्तपणे त्यांच्या घटस्फोटाबाबत माहिती दिली आहे. ईशा व भरत यांचं लग्न २९ जून २०१२ रोजी साध्या पद्धतीने इस्कॉन मंदिरात झालं होतं. या जोडप्याला राध्या व मिराया नावाच्या दोन मुली आहेत.गेल्या अनेक दिवसांपासून ईशा पती भरत तख्तानीपासून विभक्त झाल्याच्या चर्चा होत होत्या. अखेर दोघांनी दिल्ली टाइम्सला निवेदन देत घटस्फोटावर शिक्कामोर्तब केलंय. लग्नाच्या ११ वर्षांनंतर परस्पर संमतीने वेगळे होत आहोत, असं त्यांनी म्हटलं आहे. दरम्यान, दुसऱ्या मुलीच्या जन्मानंतर ईशा आणि भरत यांच्या नात्यात दुरावा आला होता, खुद्द ईशाने तिच्या पुस्तकात याबाबत लिहिलं आहे. लग्नाच्या पाच वर्षांनंतर ईशा व भरत या जोडप्याने त्यांच्या पहिल्या बाळाचं स्वागत केलं होतं. ईशाने २०१७ मध्ये मुलगी राध्याला जन्म दिला. त्यानंतर ऑक्टोबर २०१९ मध्ये त्यांची दुसरी मुलगी मिरायाचा जन्म झाला. ईशाने २०२० मध्ये 'अम्मा मिया: स्टोरीज, ॲडव्हाइस अँड रेसिपीज फ्रॉम वन मदर टू अदर' नावाचं पुस्तक लिहिलं आहे. त्यात तिने सांगितलं होतं की तिच्या दुसऱ्या मुलीच्या जन्मानंतर भरतला दुर्लक्षित वाटत होतं, कारण ती त्याला वेळ देऊ शकत नव्हती.डीएनए' च्या वृत्तानुसार, ईशाने पुस्तकात लिहिलंय, "माझ्या दुसऱ्या बाळाच्या जन्मानंतर काही काळाने माझ्या लक्षात आलं की भरत चिडचिड करत होता आणि माझ्यावर चिडायचा. त्याला वाटलं की मी त्याच्याकडे नीट लक्ष देत नाही. नवऱ्याला असं वाटणं अगदी साहजिक आहे, कारण त्यावेळी मी राध्याच्या प्लेस्कूलच्या गोष्टीत आणि मिरायाला खाऊ घालण्यात व्यग्र होते.



# जसप्रीत बुमराहने इतिहास रचला!

## बुमराहने कसोटी क्रमवारीत अव्वल स्थानावर झेप घेतली

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहयाने कसोटी क्रमवारीत अव्वल स्थानावर झेप घेतली आहे. वनडे, टी 20 आणि कसोटीमध्ये अव्वल स्थान पटकावणाराजसप्रीत बुमराह पहिलाच गोलंदाज ठरलाय. बुधवारी आयसीसीनेकसोटी क्रमवारी जारी केली. जसप्रीत बुमराह याने नुकतेच इंग्लंडविरोधात दुसऱ्या कसोटी सामन्यात नऊ विकेट घेतल्या होत्या. पहिल्या सामन्यातही त्याने भेदक मारा केला होता. जसप्रीत बुमराह याने जोरदार कमबॅक करत पहिल्या स्थानावर झेप घेतली आहे. बुमराहने अश्विनला खाली खेचत अव्वल स्थान काबिज केलेय. फक्त 34 कसोटी सामन्यात जसप्रीत बुमराहने अव्वल स्थानावर झेप घेतली. आघाडीच्या दहा गोलंदाजामध्ये जसप्रीत बुमराहशिवाय आर. अश्विन आणि रवींद्र जाडेजा यांचा समावेश आहे.**



भारताचा स्टार फिरकीपटू आर अश्विन याला पछाडत अव्वल स्थान काबिज केलेय. ताज्या क्रमवारीनुसार, अश्विन याला दोन अंकाचा फटका बसलाय. अश्विन तिसऱ्या क्रमांकावर घसरला आहे. जसप्रीत बुमराह 881 अंकासह पहिल्या स्थानावर आहे. दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कगिसो रबाडा क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. रबाडाकडे 851 पॉईंट्स आहेत. आर. अश्विन 841 पॉईंट्ससह तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारताचा स्टार फिरकी गोलंदाज रवींद्र जडेजा 746 पॉईंट्ससह नवव्या क्रमांकावर विराजमान आहे. जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे वर्षभर क्रिकेटपासून दूर होता. त्याने जोरदार कमबॅक केले. 2022 मध्ये जसप्रीत बुमराह दुखापतग्रस्त झाला होता. त्यानंतर तो वर्षभर क्रिकेटपासून दूर होता. बुमराहवर शस्त्रक्रिया झाली होती. त्यानंतर बुमराह याने टी 20 क्रिकेटमधून सर्वात आधी क्रिकेटच्या मैदानावर कमबॅक केले. त्यानंतर वनडे आणि आता कसोटीमध्ये त्याने जोरदार कमबॅक केलेय. यंदाच्या वर्षात चार कसोटी सामने खेळत जसप्रीत बुमराहने अव्वल स्थान पटकावले आहे. जसप्रीत बुमराहने फिरकीला पोषक असणाऱ्या खेळपट्टीवरही विकेट घेतल्या आहेत. भारतीय संघाचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला इंग्लंडविरुद्धच्या उत्कृष्ट गोलंदाजीचा फायदा झाला आहे. आता जसप्रीत बुमराह कसोटीत क्रमवारीत जगातील नंबर वन गोलंदाज बनला आहे. सध्या त्याचे ८८१ गुण आहेत. बुमराहने इंग्लंडविरुद्ध उत्कृष्ट गोलंदाजी केली होती. आता बुमराह तिन्ही फॉरमॅटमध्ये अव्वल ठरणारा जगातील पहिला गोलंदाज ठरला आहे.

विशाखापट्टणम येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात बुमराहने पहिल्या डावात ६ विकेट घेतल्या. तर दुसऱ्या डावातही बुमराहने ३ फलंदाजांना बाद केले होते.भारतीय संघाचा स्टार गोलंदाज आणि कसोटी उपकर्णधार जसप्रीत बुमराहने त्याचा सहकारी गोलंदाज रविचंद्रन अश्विनला मागे टाकले आहे. बुमराहपूर्वी आर अश्विन कसोटीत नंबर वन गोलंदाज होता, पण आता ८८१ गुणांसह जसप्रीत बुमराह कसोटीत नंबर वन गोलंदाज बनला आहे. नवीन ताज्या कसोटी क्रमवारीनुसार आर अश्विन आता ८४१ गुणांसह तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. तर दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा ८५१ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. त्यांच्या स्थानात कोणताही बदल झालेला नाही.आर. अश्विनशिवाय फिरकी गोलंदाज रवींद्र जडेजा यालाही ताज्या कसोटी क्रमवारीत मोठा धक्का बसला आहे. वास्तविक, या ताज्या क्रमवारीपूर्वी जडेजा आठव्या स्थानावर होता, पण आता यानंतर तो दहाव्या स्थानावर घसरला आहे. त्याचवेळी इंग्लंडचा ४१ वर्षीय वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसनला एका स्थानाचा फायदा झाला असून तो आठव्या स्थानावरून सातव्या स्थानावर पोहोचला आहे.

### विल्यमसन फलंदाजांमध्ये अव्वल

याशिवाय नॅथन लायन दहाव्या स्थानावरून आठव्या स्थानावर पोहोचला आहे. अश्विन, जडेजा आणि जसप्रीत बुमराह हे भारताचे सर्वात महत्त्वाचे गोलंदाज आहेत, ज्यांनी आपल्या उत्कृष्ट गोलंदाजीने भारताला अनेक सामने जिंकून दिले आहेत.कसोटीच्या फलंदाजी क्रमवारीत न्यूझीलंडचा कर्णधार केन विल्यमसन अव्वल स्थानावर आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेत त्याने चमकदार कामगिरी केली असून पहिल्या कसोटीच्या दोन डावांत त्याने दोन शतके झळकावली आहेत. त्याचवेळी ऑस्ट्रेलियाचा स्टीव्ह स्मिथ एका स्थानाच्या झेप घेऊन दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे.

# न्यूझीलंडच्या विजयानंतर डब्ल्यूटीसी गुणतालिकेत बदल!

## ऑस्ट्रेलिया दुसऱ्या आणि भारत तिसऱ्या क्रमांकावर घसरला आहे

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत 281 धावांनी विजय मिळवून न्यूझीलंडने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या पॉइंट टेबलमध्ये मोठा बदल घडवला आहे. किवी संघ आता पहिल्या स्थानी पोहचला आहे. ज्यानंतर ऑस्ट्रेलिया दुसऱ्या आणि भारत तिस-या क्रमांकावर घसरला आहे.**




भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या 5 सामन्यांच्या कसोटी मालिकेसोबतच न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातही 2 सामन्यांची कसोटी मालिकाही खेळवली जात आहे. त्यामुळे प्रत्येक सामन्याच्या निकानंतर डब्ल्यूटीसीच्या गुणतालिकेत बदल होत आहे. नुकताच न्यूझीलंड विरुद्ध द. आफ्रिका यांच्यातील पहिला कसोटी सामना पार पडला. त्यात किवींनी द. आफ्रिकेचा पराभव करून डब्ल्यूटीसी गुणतालिकेत 66.66 विजयी टक्केवारीसह पहिले स्थान पटकावले. डब्ल्यूटीसी 2023-25 च्या हंगामात न्यूझीलंडने आतापर्यंत 3 पैकी 2 कसोटी जिंकल्या आहेत. तर एक गमावली आहे. गुणतालिकेत कांगारूंचा संघ दुस-या स्थानावर आहे. त्यांनी 10 पैकी 6 कसोटी जिंकल्या असून 3 गमावल्या आहेत. त्यांच्या विजयाची टक्केवारी 55 आहे.न्यूझीलंडच्या विजयामुळे भारतीय संघाचे नुकसान झाले आहे. 52.77 विजयी टक्केवारीसह रोहित सेना तिस-या स्थानावर पोहोचली आहे. भारतीय संघाने डब्ल्यूटीसी 2023-25 च्या पर्वात भारताने आतापर्यंत 6 कसोटी सामने खेळले आहेत. ज्यातील 3 जिंकले असून 2 गमावले आहेत. एक सामना अनिर्णित राहिला आहे. इंग्लंडविरुद्ध मालिकेतील अजून 3 सामने शिल्लक आहेत. या सामन्यांत विजय मिळवल्यास भारत पुढील काळात नक्कीच गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहचेल.बांगलादेशची विजयाची टक्केवारी 50 आहे. या संघाने आतापर्यंत एक कसोटी जिंकली असून एक सामना गमावला आहे. ते चौथ्या स्थानावर आहेत.

### इतर संघांची स्थिती काय आहे?

पाकिस्तानची विजयाची टक्केवारी 36.66 टक्के आहे. त्यांनी 5 पैकी 2 सामने जिंकले आहेत. वेस्ट इंडिज 4 सामन्यात 1 विजयासह सहाव्या स्थानावर आहे. तर द. आफ्रिका 3 सामन्यात 1 विजय मिळवून सातव्या स्थानावर आहे. इंग्लंडने 7 सामने खेळले आहेत. ज्यातील त्यांनी 3 जिंकले आहेत. ते आठव्या स्थानावर आहेत. श्रीलंका 3 सामन्यात 1 विजयासह नवव्या स्थानावर आहे.न्यूझीलंडने पहिली कसोटी सहज जिंकली. पहिल्या डावात किवी संघाने रचिन रवींद्र (240) आणि केन विल्यमसन (109) यांच्या खेळीच्या जोरावर 511 धावांचा डोंगर रचला. द. आफ्रिकेच्या नील ब्रँडने 6 विकेट घेतल्या. आफ्रिकेला फॉलोऑन न देता फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि दुसरा डाव 179 धावांवर घोषित केला.